# म्हाडाच्या सोडतीमधील पत्रकार प्रवर्गातील यशस्वी अर्जदारांच्या पात्रतेबाबत तसेच पत्रकार संवर्गात यशस्वी अर्जदारांना पत्रकार असल्याचे प्रमाणपत्र देण्यासाठी अंतिम निकष / नियमावली

**अ)** महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास (जमिनीची विल्हेवाट) नियम, १९८१ मधील नियम (जी) मध्ये पत्रकाराची नमूद व्याख्या पुढीलप्रमाणे -

(Journalist means a person whose principal avocation is that of journalist and who is employed as such in, or in relation to, any newspaper establishment, and includes an editor, a leader writer, news editor, feature writer, copy tester, reporter, correspondent, cartoonist, news photographer, proof reader and a person who contributes regularly and meaningfully on matters on public interest to renowned weeklies, magazines and periodicals as a free lancer, but does not include any such person who

i) is employed mainly in a managerial or administrative capacity; or

ii) being employed in a supervisory capacity, performs either by the nature of duties to his office or by reason of the powers vested in him, functions mainly of a managerial nature;)

पत्रकाराच्या उपरोक्त व्याख्येमध्ये दि. ०१/११/२०१८ रोजीच्या अधिसुचनेनुसार बदल करण्यात आला असून वृत्तवाहिन्यांमधील पत्रकारांबाबत नव्याने काही शब्दांचा उल्लेख करण्यात आला आहे.

Maharashtra Housing & Area Development (Disposal of Land) Rules, 1981 in Clause (g), after the words "Proof reader" the words " T. V. Journalist, Video Journalist, Reporters of Electronic Media" shall be inserted.

**ब)** वृत्तवाहिनी/ वृत्तपत्रे/ साप्ताहिके/मासिके/नियतकालिके या माध्यमांमध्ये संपादकीय विभागात तसेच मुक्त पत्रकार म्हणून काम करण्याचा किमान सलग पाच वर्षांचा अनुभव असावा. (वरील अटींची पूर्तता करणारे पत्रकार हे स्वतंत्र व्यवसायी किंवा करार पद्धतीने नेमणूक झालेले अथवा श्रमिक पत्रकार असू शकतील). सोडतीतील यशस्वी अर्जदार कार्यरत असलेले वृत्तपत्र/साप्ताहिक/मासिक/नियतकालिक हे

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन यांनी तयार केलेल्या शासनमान्य यादीवर असणे आवश्यक आहे.

**क)** ज्यांच्या स्वत:च्या नांवे किंवा पतीच्या / पत्नीच्या नावे मुंबई महापालिकेच्या कार्यक्षेत्रात किंवा संबंधित सोडतीतील सदनिका/भूखंड ज्या महापालिकेच्या कार्यक्षेत्रात येते त्या कार्यक्षेत्रात सदनिका अथवा भूखंड नसावा. तसेच ज्यांनी यापूर्वी म्हाडा / सिडको / मुख्यमंत्री स्वेच्छाधिकार कोट्यातून (१० टक्के ते ५ टक्के) सदनिका घेतलेली नाही असे पत्रकार.

**ड)** वृत्तवाहिनीतील संपादकीय विभागात कार्यरत खालील पदांचा पत्रकार प्रवर्गात समावेश होईल.

१) वरिष्ठ कार्यकारी संपादक (Senior Executive Editor),
२) कार्यकारी संपादक (Executive Editor),
३) सहाय्यक संपादक (Assistant Editor),
४) वृत्त संपादक (News Editor),
५) सहाय्यक संपादक (Associate Editor),
६) वरिष्ठ निर्माता (Senior Producer),
७) निर्माता (Producer),
८) सहयोगी निर्माता (Associate Producer),
९) सहाय्यक निर्माता (Assistant Producer),
१०) आशय निर्माता (Content Producer),
११) प्रतिनिधी (Correspondent),
१२) बातमीदार/वार्ताहर (Reporter),
१३) कॅमेरामन (व्हिडिओ जर्नालिस्ट),
१४) वरिष्ठ संपादक (Senior Editor),
१५) वृत्तनिवेदक (Anchor),
१६) विशेष प्रतिनिधी (Special Correspondent),
१७) वरिष्ठ कॅमेरामन (Senior Cameraman),
१८) सहयोगी कॅमेरामन (Associate Cameraman),
१९) उपनिर्माता (Deputy Producer),
२०) Head Planning & Special Project,
२१) Chief Anchor,
२२) Head News & Programme Production,
२३) Associate Executive Producer,
२४) Assignment Head,

२५) Associate Senior Producer,
२६) Junior Cameraman,
२७) Bureau Chief,
२८) Head News Gathering,
२९) Copy Writer,
३०) Stringer
३१) Input Editor,
३२) Senior Executive Producer,
३३) Senior Reporter,
३४) Copy Editor,
३५) Outpur Editor,
३६) Deputy Executive Producer,
३७) Senior Assistant Producer,
३८) Principal Correspondent,
३९) Senior Copy Editor,
४०) Senior Correspondent,
४१) Senior Sub Editor,
४२) Channel Head,
४३) Bulletin Producer cum Anchor,
४४) Bulletin Producer,
४५) Associate Bulletin Producer,
४६) Assistant Cameraman

तथापि खालील व्यक्तींचा 'पत्रकार' या गटामध्ये समावेश होत नाही. वृत्तवाहिन्यांमध्ये पत्रकारिता, वृत्त संकलन, वृत्त संपादन, वार्तांकन क्षेत्र वगळता व्हिडिओ एडिटर, मेकअप आर्टीस्ट, हेअर स्टायलिस्ट, लायब्ररीयन, सिनीअर लायब्ररीयन, प्लॅनर ऑन स्पेशल प्रोजेक्ट, ग्राफिक डिझायनर, आर्टिस्ट, तांत्रिक पदे.

**इ)** म्हाडाच्या सदनिकेकरिता 'पत्रकार' संवर्गातून अर्ज करणाऱ्या वृत्तवाहिनी/वृत्तपत्रे/साप्ताहिके/मासिके/नियतकालिके या माध्यमांतील यशस्वी अर्जदाराचे 'पत्रकार' म्हणून काम करताना पूर्णवेळ उपजिविकेचे साधन हे पत्रकारिता असणे बंधनकारक आहे. दूरचित्रवाणी/वृत्तवाहिन्या केंद्र सरकारच्या माहिती व प्रसारण विभागात नोंदणी झालेल्या आणि २४ तास वृत्त प्रसारण करणा-या असाव्यात.

**ई)** महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन यांच्याकडे वृत्तविषयक संकेतस्थळांबाबत (Web News Portal) कोणतेही धोरण अद्यापपर्यंत स्विकारलेले नाही. करिता वेब न्यूज पोर्टलच्या संपादकीय विभागात काम करणारा कर्मचारी पत्रकार समजला जाणार नाही.

**फ) मुख्य जनसंपर्क अधिकारी / प्राधिकरण यांच्यातर्फे 'पत्रकार' असल्याचे प्रमाणपत्र देताना संबंधित विजेत्या अर्जदाराने सादर करावयाची कागदपत्रे**

१) वृत्तवाहिनी/ वृत्तपत्र/ साप्ताहिक/मासिक/नियतकालिक या माध्यमांच्या संबंधित संपादकांनी संबंधित यशस्वी अर्जदार हा त्या संस्थेच्या संपादकीय विभागात कार्यरत असल्याचा स्पष्ट उल्लेख असलेले व अनुभवाचे पत्र संबधित संस्थेच्या मूळ लेटरहेडवर आपल्या स्वाक्षरीसह देणे आवश्यक आहे.

२) पत्रकारितेत सलग किमान ५ वर्ष अनुभव असल्याचे प्रमाणपत्र (Experience Certificate) किंवा पत्रकार म्हणून काम केलेल्या संस्थेमधील नियुक्ती पत्राची (Appointment Letter) स्वसाक्षांकित छायांकित प्रत यशस्वी अर्जदाराने सादर करावी,

३) संबंधित सोडतीच्या मााहिती पुस्तिकेत नमूद कालावधीतील निव्वळ पत्रकारितेतून मिळणा-या उत्पन्नासंदर्भातील कागदपत्रांची स्वसाक्षांकित छायांकित प्रत (वेतन प्रमाणपत्र, वेतन पावत्या, वेतन बँक खात्यावर जमा झाल्याचे बँक स्टेटमेंट/पासबुक छायांकित प्रत, मुक्त पत्रकारितेकरिता मानधन मिळाल्याचे प्रमाणपत्र / कागदपत्र) सादर करावी,

४) पत्रकार म्हणून सोडतीतील यशस्वी अर्जदार काम करीत असलेले दैनिक/मासिक/साप्ताहिक/नियतकालिक महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन यांनी तयार केलेल्या वृत्तपत्रांच्या शासनमान्य यादीवर असणे गरजेचे आहे व तसे प्रमाणपत्र / कागदपत्र सादर करावे लागेल,

५) वृत्तवाहिनी केंद्र सरकारच्या माहिती व प्रसारण विभागात नोंदणीकृत व २४ तास वृत्त प्रसारण करणारी सॅटेलाईट वृत्तवाहिनी असावी,

६) वृत्तपत्रे/ साप्ताहिके/मासिके/नियतकालिक यामध्ये काम करणाऱ्या बातमीदार / वार्ताहर / प्रतिनिधीने सोडतीत विजेता ठरल्यानंतर गेल्या २ वर्षातील श्रेयनामावलीची कात्रणे (By line clippings) मूळ प्रत सादर करणे आवश्यक आहे किंवा वृत्तवाहिनीत स्वत:च्या नावानीशी प्रसारित बातम्यांची ध्वनीचित्रफित सीडी/डीव्हीडी/पेन ड्राईव्हमध्ये (१ प्रत) सादर करावी,

७) सद्यस्थितीत अर्जदार कार्यरत संस्थेने दिलेल्या ओळखपत्राची छायांकित प्रत,

८) स्वयंघोषणापत्र (Self declaration) **(नमुना प्रत संलग्न),**

**९**) संबंधित मंडळाने सोडतीत यशस्वी अर्जदाराला पाठविलेल्या प्रथम सूचना पत्राची (First Intimation Letter) छायांकित प्रत सादर करावी.

**‘पत्रकार’ असल्याचे प्रमाणपत्र प्राप्त करण्यासाठी संबंधित विजेत्या अर्जदाराने सादर करावयाचे स्वयंघोषणापत्र (Self Declaration)**

हे स्वयंघोषणापत्र दि. ___________ रोजी ________ मंडळाच्या _______ मधील सदनिका सोडतीतील विजेते अर्जदार श्री./सौ./कु. ______________________ वय ___ वर्ष राहणार (पूर्ण पत्ता) ___________________________________________________________________________________

मुख्य जनसंपर्क अधिकारी, महाराष्ट्र गृहनिर्माण आणि क्षेत्र विकास प्राधिकरण, गृहनिर्माण भवन, कला नगर, वांद्रे पूर्व, मुंबई - ४०००५१ यांच्या नावे प्रस्तुत करतो / करते की, ________ गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळातर्फे (म्हाडाचा विभागीय घटक) जाहीर सन________ सोडतीत माझा अर्ज क्रमांक (Application Number)_________ _________ संकेत क्रमांक (Scheme Code) ____________ प्रवर्ग (Category) __________ मध्ये यशस्वी (Successful) म्हणून जाहीर करण्यात आला आहे. ________ गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाने दि._________ रोजी पाठविलेल्या प्रथम सूचना पत्र क्रमांक (First Intimation Letter) _____________ नुसार मला पत्रकार असल्याचे प्रमाणपत्र सादर करावयाचे आहे. त्याकरिता सबळ पुरावा म्हणून आवश्यक कागदपत्रे जसे की, **१)** पत्रकारितेत सलग ५ वर्ष अनुभव असल्याचे सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले प्रमाणपत्र किंवा पत्रकार म्हणून काम केलेल्या संस्थेतील नियुक्ती पत्राची (Appointment Letter) स्वसाक्षांकीत छायांकित प्रत, **२)** माहिती पुस्तिकेत नमूद कालावधीतील निव्वळ पत्रकारितेतून मिळणाऱ्या उत्पन्नासंदर्भातील कागदपत्रांची स्वसाक्षांकीत छायांकित प्रत (वेतन प्रमाणपत्र, वेतन पावत्या, वेतन बँक खात्यावर जमा झाल्याचे बँक स्टेटमेंट / पासबुकची छायांकित प्रत, मुक्त पत्रकारितेकरिता मानधन मिळाल्याचे प्रमाणपत्र / कागदपत्र, **३)** अर्जदार सद्यस्थितीत कार्यरत असलेल्या संबंधित वृत्तपत्राच्या / वृत्तवाहिनीच्या संपादकांचे शिफारस पत्र, **४)** माहिती पुस्तिकेत नमूद कालावधीतील वृत्तपत्रांत स्वतःच्या नावानिशी प्रसिद्ध / प्रकाशित (By line / Credit Line) बातम्या / लेख यांची किमान १० कात्रणे किंवा वृत्तवाहिनीत स्वतःच्या नावानिशी प्रसारित बातम्यांची ध्वनिचित्रफीत सीडी / डीव्हीडीमध्ये (१ प्रत), **५)** सद्यस्थितीत अर्जदार कार्यरत संस्थेने दिलेल्या ओळखपत्राची छायांकित प्रत, **६)** पत्रकार म्हणून सोडतीतील विजेता/ विजेती अर्जदार काम करीत असलेले दैनिक/ मासिक/साप्ताहिक / नियतकालिक महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन यांनी तयार केलेल्या वृत्तपत्रांच्या शासनमान्य यादीवर असल्याचे प्रमाणपत्र / कागदपत्र मुख्य जनसंपर्क अधिकारी, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण यांच्या कार्यालयात सादर करीत असून उपरोक्त नमूद सर्व कागदपत्र / प्रमाणपत्र माझ्या माहितीप्रमाणे खरी व योग्य आहेत.

जर मी सादर केलेल्या कागदपत्रांपैकी कोणतेही कागदपत्र चुकीचे, खोटे, बनावट असल्याचे आढळून आल्यास त्याला पूर्णपणे मी जबाबदार राहील व महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाला (म्हाडा) मला वाटप केलेली सदनिका रद्द करण्याचा व माझ्या विरुद्ध कायदेशीर खटला सुरु करण्याचा अधिकार राहील, या कायदेशीर कार्यवाहीला केवळ मी एकटा/एकटी जबाबदार राहील.

मी याद्वारे नमूद करत आहे की, या योजनेच्या संदर्भात हे स्वयंघोषणापत्र मला आणि माझ्या कायदेशीर वारसांचे उत्तराधिकारी इत्यादींना बंधनकारक असेल.

**विजेत्या अर्जदाराचे पूर्ण नाव व स्वाक्षरी ___________________________**
**ठिकाण:**
**दिनांक :**